प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

CIDCO WE MAKE CITIES

सिडको शहरांचे शिल्पकार

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

**दि. ०७.०३.२०१९**

# सिडकोच्या नवी मुंबई येथील भाडेपट्टा (लीज) जमिनींचे रुपांतरण - लीज डीड सुधारणा-२०१९ योजनेचे सिडकोमध्ये सादरीकरण

शासनाने (महसूल व वन विभाग) शासकीय जमिनींसंदर्भात फ्रिहोल्ड धोरण निश्चित केले व त्या धर्तीवर सिडकोनेदेखील संचालक मंडळ ठराव क्र. ११९१२ दि. ११.०८.२०१७ अन्वये लीजशी संबंधित काही अटी शिथिल करण्याचा निर्णय घेतला. या अनुषंगाने फ्रि होल्डप्रमाणे सर्व सुविधा नवी मुंबईतील रहिवाशांना मिळाव्यात म्हणून भाडेपट्ट्याच्या अटी शिथिल करण्याचा प्रस्ताव संचालक मंडळामसोर मांडण्यात आला होता. सदर लीज डीड सुधारणा योजना २०१९ चा जास्तीत जास्त नागरिकांना लाभ घेता यावा यासाठी या योजनेची प्रक्रीया व एकूणच सर्वंकष माहिती आज दिनांक ७ मार्च २०१९ रोजी सिडको भवन येथे सादरीकरणाच्या माध्यमातून देण्यात आली.

या प्रसंगी सिडकोचे अध्यक्ष **श्री. प्रशांत ठाकूर**, आमदार **श्रीमती. मंदाताई म्हात्रे**, व्यवस्थापक (शहरसेवा) **श्री. फैय्याज खान**, वसाहत अधिकारी - १ **श्री. अभय वेदपाठक,** जनसंपर्क अधिकारी **श्रीमती. प्रिया रातांबे** व नवी मुंबईतील नागरिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

सदर योजनेची अंमलबजावणी करून सिडकोने पहिला टप्पा पार पाडला आहे. ही योजना २ वर्षांसाठी असून या कालावधीमध्ये सदर योजना राबवतना नागरिकांना जर काही अडचणी आल्या तर भविष्यात त्यांचे निराकरण करून योजनेमध्ये आणखीन सुधारणा करता येऊ शकतात. त्यासाठी सिडकोतर्फे नागरिकांच्या शंका निरसनासाठी कार्यक्रमदेखील आयोजित करता येईल असा विश्वास या प्रसंगी श्री. प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केला.

सदर योजना अस्तित्वात आणण्यासाठी सिडकोने खूप मेहनत घेतली आहे. सिडकोने नेहमीच लोककल्याणाच्या योजनेत नागरिकांना सहकार्य केले आहे. त्यामुळे या योजनेचादेखील नवी मुंबईतील नागरिकांना मोठ्या प्रमाणावर फायदा होईल असा विश्वास श्रीमती. मंदाताई म्हात्रे यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमासाठी नवी मुंबईतील विविध नोड्समधील नागरिक उपस्थित होते. लीज डीड सुधारणा- २०१९ योजनेसंदर्भात नागरिकांच्या अनेक शंकांचे निरसन सिडकोचे व्यवस्थापक (शहरसेवा) यांनी केले. त्याचप्रमाणे भविष्यातदेखील सदर योजना लागू असेपर्यंत सिडकोतर्फे नागरिकांना या योजनेचा लाभ घेण्यासाठी पूर्ण सहकार्य केले जाईल असे श्री. फैय्याज खान यांच्याकडून स्पष्ट करण्यात आले. नागरिकांनीदेखील सिडकोतर्फे घेण्यात आलेल्या या निर्णयाचे स्वागत केले.

"सिडकोच्या नवी मुंबई येथील भाडेपट्टा (लीज) जमिनींचे रुपांतरण- लीज डीडची सुधारणा- २०१९ योजना" करीता लीजधारकाने ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक असणार आहे. सुरुवातीस सदर योजना ही २ वर्षांकरिता लागू असेल. त्यानंतर योजनेची प्रक्रिया व मिळणारा प्रतिसाद यांचे विश्लेषण करून योजनेचा कालावधी वाढविण्याबाबत विचार केला जाऊ शकतो.

सिडको महामंडळाने संचालक मंडळ ठराव क्र. ११९१२ दि. ११.०८.२०१७ अन्वये लीजशी संबंधित काही प्रमुख अटी शासनाच्या मान्यतेने शिथिल करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये लीजचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर त्यावेळेस लागू धोरणानुसार अतिरिक्त शुल्क/प्रिमियम आकारून, ३९ वर्षांकरिता वाढवून दिला जाईल व त्यावेळीही सदर योजनेत अंतर्भूत सवलती चालू राहतील. जमीन/सदनिका यांच्या हस्तांतरणासाठी/तारण ठेवण्यासाठी सिडकोचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यापासून जमिनधारकास सूट मिळणार आहे. त्याचप्रमाणे विकास नियंत्रण नियमावलीच्या अधीन राहून 'वापर बदला' साठी सिडकोचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यापासूनदेखील जमिनधारकास सूट मिळणार आहे.

सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी एकवेळ भरावे लागणारे रुपांतरण अधिमूल्य (OTCP) २५ चौ.मी. पर्यंतच्या निवासी भूखंडासाठी ५ टक्के, २५ चौ.मी. हून अधिक आणि ५० चौ.मी. पर्यंत असलेल्या निवासी भूखंडासाठी १० टक्के, ५० चौ.मी. हून अधिक आणि १०० चौ.मी. पर्यंत असलेल्या निवासी भूखंडासाठी १५ टक्के, १०० चौ.मी. हून अधिक असलेल्या निवासी भूखंडासाठी २० टक्के, २०० चौ.मी. पर्यंत असलेल्या वाणिज्यिक भूखंडासाठी २५ टक्के व २०० चौ.मी. हून अधिक वाणिज्यिक भूखंडासाठी ३० टक्के निश्चित करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे निवासी तथा वाणिज्यिक भूखंडांसाठीचे रूपांतरण शुल्क अनुक्रमे निवासी आणि वाणिज्यिक वापराच्या टक्केवारीच्या प्रमाणात वर नमूद केलेल्या टक्केवारीच्या अनुषंगाने आकारण्यात येणार आहे. सदर योजनेत पात्र ठरणाऱ्या लाभधारकांचे भूखंड हे जवळपास भोगवटादार वर्ग-१ जमिनीप्रमाणे नियंत्रणमुक्त होणार आहेत.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.
**जनसंपर्क विभाग, सिडको**